## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**शोधप्रबंधाचा प्रारंभिक आराखडा**

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक - राजकीय विचारांची प्रासंगिकता - एक अभ्यास

**सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी) पदवीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यास सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्रारंभिक आराखडा**

**: संशोधक :**

**कृष्णा दिगांबरराव गाडगे**

M.A., B.Ed.

**: मार्गदर्शक :**

**प्रा.डॉ. विठ्ठल तुकाराम दहिफळे**

राज्यशास्त्र विभाग,पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र,

पीपल्स कॉलेज, नांदेड.

**डिसेंबर २०२४**

## महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक - राजकीय विचारांची प्रासंगिकता -एक अभ्यास

**प्रस्तावना :-**

आधुनिक महाराष्ट्राची आणि भारताची पुनर्घटना सदसद् विवेकाच्या आणि न्यायाच्या आधारे करण्याचा प्रयत्न करणाऱ्या मोजक्या विभूतीपैकी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे होते. मुळात ते धर्मनिष्ठ होते. मात्र उन्नत भूमिकेतील धर्मकार्य आणि सामाजिक-राजकीय कार्य एकरूपच आहेत,अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. त्यांच्या जीवनात अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला मध्यवर्ती स्थान होते. हे कार्य त्यांनी धर्मकार्य म्हणूनच केले. अस्पृश्यता निवारणाचे कार्य हा त्यांचा आयुष्यभराचा ध्यास होता.

महात्मा ज्योतिबा फुले  यांनी एकोणिसाव्या शतकाच्या मध्याला अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला युग प्रवर्तक प्रारंभ केला. मात्र समकालीन पांढरपेशा समाजाकडून त्यांच्या या कार्याला प्रतिसाद न मिळाल्याने ते खंडित झाले. विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतामध्ये माणुसकीला कलंकभूत असणारा अस्पृश्यते सारखा एक भयंकर प्रश्न अस्तित्वात आहे, याची फारशी कोणाला जाणीव नव्हती. अशा काळात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यत मानलेल्या वर्गाची उन्नती करण्याचे व अस्पृश्यता निवारणाचे कार्य संस्थात्मक प्रयत्नांच्या द्वारा अखिल भारतीय पातळीवर करण्याचा दूरदृष्टीपणा आणि कार्यकर्तेपणा दाखविला. या कामासाठी त्यांनी अतुलनीय स्वार्थत्याग केला, अविश्रांत परिश्रम घेतले व अस्पृश्यता निवारणाच्या कार्याबद्दल पंचवीस एक वर्षात भारतभर अपूर्व अशी जागृती केली.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी एकोणिसाव्या शतकामध्ये अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला प्रथम सुरुवात केली होती.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक राजकीय विचारांची प्रासंगीकता पाहत असताना असे दिसून येते. अस्पृश्यता निवारण कार्याची दोन महान पर्वे आहेत. त्यातील पहिले पर्वत जागृतीचे, अस्पृश्यता निर्मूलनाचे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे महत्त्वपूर्ण भूमिका होती.

दुसरे पर्व संघर्षाचे, अस्पृश्यता निवारणाचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अस्पृश्यता निर्मूलन कार्यामुळे पुढच्या संघर्ष परवाची स्वाभाविकपणेच पूर्वतयारी झाली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची सामाजिक समस्या जाणून घेऊन सामाजिक चळवळी, सामाजिक सुधारणा आणि सामाजिक संघर्ष दिसून येत होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यांच्या निर्मूलन क्षेत्रातील कार्य व मांडलेला धर्मविचार अजोड आहे, मात्र महाराष्ट्राने आजवर त्यांच्या या योगदानाची म्हणावी तशी दखल घेतली नाही, अशी खंत गेली अनेक वर्ष काही संवेदनशील समाजचिंतक व्यक्त करत आहेत.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याची महती जाणून घेऊन पुढील पिढीला पोहोचण्याच्या प्रयत्न सातत्याने करणार आहोत.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे एवढे सविस्तर, सांगोपांग, समतोल, गौरवपर पण त्याच वेळी तटस्थ व अस्सल साधनांवर आधारलेले हे पहिलेच चरित्र कर्मवीर आहेत. या चरित्राबद्दल व चरित्रनायकाबद्दल सांगायचे तर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जीवनाबद्दल आकलनही विनीत भावाने सादर करतो.

गेली दोन काही दशकात महाराष्ट्राचा साक्षेपी वेध घेतल्यास एका गोष्टीची एक वाक्यता आढळते. ती म्हणजे विठ्ठल रामजी शिंदे यांच्या असाधारण अशा सर्वगामी कार्याची आपण आजवर केलेली उपेक्षा. याचा उलगडा करण्याचा प्रयत्न जाणत्यांनी वेळोवेळी केला आहे. अशा उपेक्षेची मीमांसा अनेक दृष्टींनी केली जाईल. ज्या मराठा समाजात ते जन्मले तो त्यांच्याविषयी उदासीन आहे. ज्या दलित समाजासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले त्याला त्याचे महत्त्व कळत नाही व राजकारणात ब्राह्मणेतर पक्षाशी सुत न ठेवता राष्ट्रीय पक्षाला मिळाले महाराष्ट्रीय वारसदारांनी सोईस्कर रीतीने त्याची अपेक्षा चालवली अस्पृश्यताधदाराचे कार्य अस्पृश्य आणि यातून वरिष्ठ वर्णनां मनापासून रुचण्यासारखे होते असे नाही, तर अस्पृश्यांमध्ये राजकारणाने नवीन वारे शिरल्याने तेही शिंदेची उपेक्षा करू लागले.

विसाव्या या शतकातील या काळात भेटलेल्या विविध विचारांच्या लोकांच्या व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कधी जवळून तर कधी दुरून असा संबंध येतो, कधी विचारातील एकता तर कधी वैचारिक मतभेद असे त्यांचे स्वरूप होते. तत्कालीन मोठमोठ्या मंडळीला भेटून त्यांचा संबंध आला. त्यावेळीच्या सामाजिक जीवनात या व्यक्तीने मोठे कार्य केले होते.

सामाजिक व राजकीय व्यक्तींशी तत्कालीन त्या व्यक्तीनी मोठे काम केले. त्यांची वृत्ती, प्रवृत्ती, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक प्रवाह या सर्वांचे आपल्याला स्मरण आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सारे जीवन सामाजिक चळवळीमध्ये गेल्याने त्यांचे आत्मचरित्र केवळ व्यक्तिगत न राहता सामाजिक नेतृत्व बनले आहे.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक, संशोधक, साहित्यिक व आध्यात्मिक दृष्टी असलेले ऋषीतुल्य जीवनाचे मानकरी होते.

महर्षी रामजी शिंदे यांच्या जीवनात प्रत्येक कार्य आध्यात्मिक कार्य म्हणून पत्करलेले होते. त्यांच्या मनाची ही अध्यात्मिक जडणघडण त्यांच्या बालपणीच तयार झाली होती. त्यांनी अन्य सामाजिक व राजकीय कार्याच्या मुळाशी धर्म भावनेचा पाया होता. शिंदे यांचे समाज सेवेचे कार्य विविध व व्यापक होते. कारण त्यांच्या सामाजिक कार्याची व्याप्ती, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक इत्यादी सर्व क्षेत्राचा विचार करणारी होती.

सामाजिक कार्याचा जसजसा व्याप वाढू लागला तसतसे आत्मचरित्रातील जीवनाचे चित्र लुप्त होताना दिसले. त्यांच्या व्यक्तिमत्वाला सामाजिकता आधिक लाभली. त्यामुळे वैयक्तिक सुखदुखे, भावनात्मक आंदोलने यापेक्षा सामाजिक समस्या, सामाजिक सुधारणा, सामाजिक चळवळ व सामाजिक संघर्ष यांचे दर्शन घडवू लागले.

अध्यात्मिक, राजकीय, सामाजिक, क्षेत्रात पूर्वगामी भूमिका घेऊन संघर्ष जीवनभर केला. अनेक संस्था उभ्या केल्या व समाजपरिवर्तनात अंतर्भूत असलेल्या विविध प्रकारच्या मूलभूत प्रश्नाबद्दल विवेंचन, विश्लेषण, संशोधन करून नवसमाजनिर्मितीसाठी आपले जीवन चंदनासारखे

झिजवले, सहदयता, रसिकता, सविष्णुता, अफाट परिश्रम, जिद्द व चिकाटी, अंगीकृत कार्यावरील दुर्दम्य निष्ठा, सेवा, समता, मानवता, निर्भीडपणा, त्याग, धैर्य अशा अनेक गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्व संपन्न झाले होते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे च्या या आत्मचरित्रात सामाजिक व राजकीय विचारांच्या संदर्भाचे बुद्धिवादी भान आणि आत्मचरित्रात्मक वाङ्मयांचे मूल्य प्राप्त झाले आहे. त्यांच्या निवेदनातील प्रामाणिकता, प्रसंगवर्णनातील चिंतनशील व भावशील, आत्मपरीक्षण, प्रसन्न जीवनसृष्टी, प्रकट चिंतन, व्यक्तिचित्रणे, संवाद विनोद भाषाशैली इत्यादी गुण दिसून येतात.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदेऔच्या सामाजिक किंवा सार्वजनिक जीवनात अनेक व्यक्ती, कार्यकर्ते, राजकीय कार्यकर्ते व थोर पुरुषांच्या बरोबर संबंध आले. त्यांच्याशी कधी वैचारिक जवळून तर कधी दुरून परिचय झाला.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे खूप मोठे कार्य केले ते म्हणजे तत्कालीन सामाजिक, राजकीय व स्वातंत्र्य, समाजाची विषमता घालवणे हे महत्त्वाचे आहे या शिंदेंच्या विचारांकडे दुर्लक्ष झालेले दिसते आहे असे संशोधनात दिसले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक - राजकीय विचारांची प्रासंगिकता -एक अभ्यास हा प्रमुख विषय असला तरी त्यांचे धार्मिक व सांस्कृतिक विचार ही संक्षिप्त स्वरूपात या संशोधनात मांडण्यात येणार आहेत.

**समस्या सुत्रण (संशोधन समस्या) :-**

समस्या ही संशोधनाची जननी असते. समस्ये शिवाय संशोधनाचा विचाराच मुळात असू शकत नाही. खरंतर संशोधन समस्या हा संशोधनातील महत्त्वाचा गाभा घटक आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपली संपूर्ण हयात अस्पृश्यता उध्दार कार्यात (निर्मूलनात) खर्ची केले ही बाब त्रिकालाबाधित सत्य आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अस्पृश्यता निर्मूलन कार्याची पावती म्हणून ब्रिटिश सम्राज्ञीद्वारा त्यांनी सुद्धा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना यांच्या या कार्याची दखल घेतली होती .

पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीचा विचार करताना प्रथमत: 'फुले -शाहू -आंबेडकर' यांच्या उल्लेख केला जातो. त्यांनी महाराष्ट्राच्या पूर्वगामीत्वाचा विचार मांडला.महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रथम अस्पृश्यता निवारण वर कार्य केले, पण त्या नंतर अस्पृश्यता निर्मूलन मोहिमेवर कार्य करणारे,एक व्यक्तीमत्व मराठा समाजाचे होते ते कोण होते?, त्यांनी अस्पृश्यता निर्मूलन कार्य यामध्ये त्याना मराठा आणि अस्पृश्य या दोन्ही समाजाने त्यांचा म्हणावे तसा विचार का नाही केला? असे ते अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य केले जाते त्याचे नाव काय? आंबेडकरांपूर्वी अस्पृश्यता निर्मूलन करणारे समाज सुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे होते. म्हणून अशा सबब बऱ्याच वेळा अस्पृश्यता निर्मूलनात कार्य करणाऱ्या व्यक्ती विषयी मला समस्या जाणवली म्हणूनच, मी त्यासाठीच या हेतूसाठीच माझ्या संशोधन कार्याचे मूळ समस्या असून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक - राजकीय विचारांची प्रासंगिकता -एक अभ्यासय या संशोधन शीर्षकानुषंगाने मला त्याचे वस्तुनिष्ठ अध्ययन करावयाचे आहे.

**विषय निवडीचे महत्त्व किंवा आवश्यकता :-**

प्रस्तुत संशोधनात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सखोल अभ्यास करून मते मांडली आहे.

ऐतिहासिक आढाव्यात तस असे दिसून येते की उपेक्षित विचारवंत आहेत. त्यांचे कार्य हे लोकशाहीवादी सामाजिक समता आणण्यासाठी होते.हे आधार स्पष्ट करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याही आधी आणि शाहू महाराजानंतर सामाजिक समता आणण्यासाठी जीवन भर ज्यांनी कार्य केले त्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्याचे महत्त्व सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासक, शिक्षक, विद्यार्थी यांना पटवून देण्यासाठी हा विषय निवडला असे मी स्पष्ट करतो. महात्मा गांधी पेक्षा त्यांचे विचार कशाप्रकारे अस्पृश्यता निर्मूलन संबंधी प्रश्नावर वेगळे होते हे ही स्पष्ट करण्याचा मी प्रयत्न करेल.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व जीवन परिचयाचा अभ्यास करणे.

२) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक विचाराचे अध्ययन करणे.

३) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे राजकीय विचार जाणून घेणे.

४) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या धार्मिक विचारांची पडताळणी/ अभ्यास करणे.

५) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निर्मूलन विषयक विचार व कार्याचे योगदानाचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहीतकृत्ये :**

१) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची जडणघडण एकोणिसाव्या शतकातील प्रबोधन प्रक्रियेचा प्रभाव आहे.

२) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक विचार हे परिवर्तनवादी आहेत.

३) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे राजकीय विचार लोकशाही परंपरांना सशक्त करतो.

४) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य हे चळवळ प्रधान होते.

५) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा सामाजिक राजकीय विचार बुद्धिवाद्यांकडून दुर्लक्षित राहिला आहे.

**संशोधन पद्धती :-**

"महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक - राजकीय विचारांची प्रासंगिकता -एक अभ्यास" या शोधप्रबंधात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जडणघडण, सामाजिक विचार, राजकीय विचार आणि आखील भारतीय अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. प्रस्तुत शोध प्रबंधाचे लेखन करण्यासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, वर्णनात्मक व विवेचनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाचे स्त्रोत (तथ्य संकलन) :-**

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी करत असताना ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, विवेचनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे हे अध्ययन सामाजिक विद्याशाखे अंतर्गत येत असल्यामुळे त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि अस्पृश्यता निर्मूलन कार्यावरील संदर्भग्रंथाच्या आधारे हे संशोधन प्राथमिक व दुय्यम स्त्रोतावर अवलंबून आहे. प्राथमिक स्त्रोतावर महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ग्रंथ, "भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न" माझी आठवण व अनुभव या विषयाचे अध्ययन करण्यासाठी व तथ्य (माहिती) संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करून करण्यात आला आहे. त्यासाठी विविध ग्रंथ,एम.फिल. पीएचडी प्रकाशित व अप्रकाशित शोध प्रबंध, ग्रंथ संदर्भग्रंथ, गौरवग्रंथ इत्यादी स्त्रोताच्या आधारे संशोधन कार्य पूर्ण केले जाईल.

**पूर्व संशोधन साहित्याचा आढावा :-**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या डॉ. गो.मा. पवार यांनी संशोधन केले आहे. तसेच डॉ.अजीतानंद जाधव यांनीही महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय विचार यावर संशोधन केले आहे. त्याचबरोबर वा.ग.पवार यांनीही एक उपेक्षित महामानव महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यावर संशोधन केले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यावर देवकते बालासाहेब व नानासाहेब यांनीही संशोधन कार्य केले आहे तसेच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी यांच्यावर गायकवाड गोरख बाबुराव यांनी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय विचार या संशोधनातून आपले विचार मांडले आहेत.

**संशोधन आराखडा (प्रकरणाची रुपरेषा) :-**

"महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक - राजकीय विचारांची प्रासंगिकता -एक अभ्यास" या विषयावर संशोधन करण्यासाठी शोधप्रबंधाच्या आराखड्यात सहा प्रकरणात मांडण्यात आला आहे.

**प्रकरण पहिले.- प्रस्तावना,व संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध प्रबंध पहिल्या प्रकरणात प्रस्तावना, समस्या सुत्रण, विषय निवडीचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतकृत्ये, संशोधन पद्धती, संशोधनाची स्तोत्र (तथ्य संकलन), पूर्व संशोधनाचा आढावा तसेच संशोधन विषयाचा आराखडा या घटकांचे विवेचन करण्यात आले आहे.

**प्रकरण दुसरे- महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जीवन परिचय**

प्रस्तुत प्रकरणात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची जडणघडण, त्यांच्या जीवन परिचयाचा आढावा जन्म, कौटुंबिक परिस्थिती, बालपण, त्यांची वंशावळ दाखवणे, समकालीन वातावरण, आई वडील, आजी-आजोबा, इतर परिवारातील सदस्य, बालपण, शालेय व महाविद्यालयीन जीवन, चौफेर वाचन, वैचारिक मते, वैवाहिक जीवन व सामाजिक कार्याची सविस्तर माहिती आढावा.

**प्रकरण तिसरे : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक विचार**

प्रस्तुत प्रकरणात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा आढावा घेण्यात आलेला आहे. ज्यामध्ये जातीय व सामाजिक सामंजस्यबाबत विचार, जातीवादी संबंधीचे विचार, धार्मिक समाजाचे विचार, शिक्षण विषयक विचार, स्त्री विषयक विचार, धर्माविषयक विचार महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या विचारांचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे. सामाजिक विषमतेच्या संदर्भातील विचार व कार्य, अस्पृश्यता निवारण कार्यासाठी स्थापन केलेल्या संस्था व कार्य डिप्रेस्ड क्लास मिशन अभ्यासणे अस्पृश्यता समाजाचे परिवर्तन व सामाजिक धर्माची शिकवण देणे या कार्याचा आढावा घेण्यात आला.

**प्रकरण चौथे : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे राजकीय विचार**

प्रस्तुत प्रकरणात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी राजकीय विचार व कार्य काय केले आहेत याचा आढावा घेऊन, नेतृत्व, पक्ष, संघटना, चळवळी, समता, लोकशाहीवादीचे विचार, हक्क, अधिकार, कर्तव्ये,राष्ट्रीय चळवळीतील संविनय कायदेभंगाचा सहभाग व शिक्षा, अखिल भारतीय दलित संघ, भारतीय युवक, शेतकरी समाज तसेच निवडणुकीतील सहभाग व आर्थिक दृष्ट्या गांजलेला बहुजन समाज व बहुसंख्य मराठा समाजाची राष्ट्रीय स्वातंत्र्याची आकांक्षा सिद्ध करण्यासाठी राजकारणात केले तसेच बहुजन पक्षाची स्थापना करून राजकीय विचार मांडले.

**प्रकरण पाचवे : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य**

प्रस्तुत प्रकरण महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी समाजातील मूलभूत बाबी जाणून घेऊन, अस्पृश्य निर्मूलनासाठी त्यांनी रात्र शाळा, सार्वजनिक धर्माचे विचार, व विविध संस्था स्थापन करून, शाळा निर्माण केल्या आणि सर्वांना अस्पृश्यता निर्मूलनात तसेच सर्वांना शिक्षणास प्रवृत्त केले. वेगवेगळ्या शाळा, संस्था, संघटना स्थापन केल्या आणि अस्पृश्यता निर्मुलनात आपल्या कार्याने ठसा उमटवला.

**प्रकरण सहावे : निष्कर्ष**

प्रस्तुत प्रकरणात शोधप्रबंधाच्या या प्रकरणात सर्व प्रकरणाची सारांश रूपाने मांडणी करण्यात आला आली असून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक, राजकीय आणि अस्पृश्यता निर्मूलन विचारांचे मूल्यमापन प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले. तसेच संशोधन विषयाला अनुसरून हाती आलेल्या निष्कर्षाची मांडणी केलेली आहे त्याचबरोबर संशोधन विषयाला अनुसरून काही निष्कर्ष निश्चित करण्यात आलेल्या गृहीत कृत्यांची पडताळणी करण्यात आली आहे.

**संदर्भसूची :**


१) भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

२) माझ्या आठवणी व अनुभव, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

३) एक उपेक्षित महात्मा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, प्रा. डॉ. एन. डी. पाटील

४) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. गो.मा. पवार

५) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. नीला पांढरे

६) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय विचार, प्रा. डॉ.अजितानंद जाधव

७) महर्षी शिंदे, ह. कि. तोडमल

८) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, रा.ना. चव्हाण

९) एक उपेक्षित महामानव महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, वा.ग. पवार

१०) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय खंड १ला, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न संशोधन आणि चिंतन, संपादक- गो.मा. पवार

११) The life and works of maharshi vittal ramji shinde, G.M. pawar.

१२) लोकशिक्षण, नटेश आप्पाजी द्रविड, आर्यभूषण छापखाना, पुणे १९१०

१३) सुशिक्षित मराठ्यांची नागरिक कर्तव्ये, मराठा स्टुडंट्स, ब्रदरहूड, पुणे १९१४

१४) दहातोंडे जी. ना., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (व्यक्ती आणि विचार) प्रतिमा प्रकाशन, पुणे (पण.आ.) १९९५

१५) तोंडमल हे.कि., महर्षी शिंदे जीवन आणि कार्य, कॉन्टिनेन्टल प्रकाशन (दु. आ.) पुणे १९८६

१६) पाटणे संभाजी राव, "महर्षी विठ्ठल रामजी शिंदे: एक धगधगीत व्यक्तिमत्व", सौ.नंदीनी तु. गवळी, प्रचार प्रकाशन, (दु.आ.) कोल्हापूर १९८१

१७) बाबर कृ. भा., शिंदे विठ्ठल रामजी कर्मवीर विद्यार्थी, हनुमान पुणे, १९३०

१८) बाबर रा.कृ., महर्षी शिंदे आणि वाई ब्राह्मसमाज

१९) मोरजे गंगाधर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व विचारधारा, दत्तात्रय रामचंद्र हिरे, फ्रेंड्स पब्लिकेशन छात्रालय, स्टेशन रोड, अहमदनगर शके १८९५.

२०) वाळिंबे मोरेश्वर, महर्षी विठ्ठलराव शिंदे, नितीन प्रकाशन, (प. आ.) पुणे, १९७७.

२१) Bugatti Shiva prabha, Renaissance in Western India, Karmveer V R.Shinde (१८७३-१९४४) Bombay Himalaya, १९८३.

२२) Thubee D.B., A Meek and modest Indian (A life sketch of Maharshi V.R. Shinde ) Pravarngar (Ahmednagar).

२३) कै. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, चित्रात जगत, फेब्रुवारी १९४४.

२४) अकोलकर ग.वि., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे पुण्यस्मरण, जन्मशताब्दी, धरती एप्रिल, १९७३.

२५) कै. शिंदे, संपादकीय, तरुण भारत, नागपूर, २२ एप्रिल १९७३.

२६) अर्नाळकर बाबुराव, महर्षी अण्णासाहेब शिंदे यांचा सहवास मराठा, मार्च १९४१.

२७) अर्नाळकर मधुकर, महर्षी अण्णासाहेब उर्फ विठ्ठल रामजी मराठा: फेब्रुवारी १९४४.

२८) डॉ शंकरराव कदम, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे साहित्य आणि कार्य.

२९) रोकडे म. रा., महर्षी वि.रा. शिंदे व्यक्ती आणि वाड्मय,नागपूर विद्यापीठ, १९८७ (अप्रकाशित प्रबंध)

३०) पाटील हिराजी, महर्षी शिंदे चरित्र व कार्य, ग.ल. ठोकळ, पोकळ प्रकाशन पुणे, १९३०.

संशोधक

**कृष्णा दिगांबरराव गाडगे**
एम. ए. राज्यशास्त्र, बी. एड.
मु.पो.ब्राह्मणगाव. ता.जी. परभणी

मार्गदर्शक

**प्रा. डॉ.विठ्ठल तुकाराम दहिफळे**
सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शन,
पदवी, पदव्युत्तर, राज्यशास्त्र विभाग व संशोधन केंद्र,
पीपल्स कॉलेज नांदेड.